# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २१ जुलै, २०१५ / आषाढ ३०, १९३७ ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) गृहनिर्माण, खनिकर्म व कामगार मंत्री**
} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४३**

---

**रसायनीतील चांभार्ली (ता.खालापूर, जि.रायगड) येथील आश्रमशाळेमध्ये संचालकांनीच अल्पवयीन मुलींवर बलात्कार केल्याबाबत**

**(१) * २५७८१ श्री.डि. मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रसायनीतील चांभार्ली (ता.खालापूर, जि.रायगड) येथील सन २०१४ पासून सुरु असलेल्या शांतीनिकेतन आश्रमशाळेमध्ये संचालकांनीच ८ अल्पवयीन मुलींवर बलात्कार करुन त्याची अश्लील चित्रफीतही काढण्यात आल्याची दुर्दैवी घटना दिनांक १२ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर संचालकांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) रसायनी पोलीस ठाणे हद्दीतील चांभार्ली ता.खालापूर येथील शांती अनाथ आश्रम मध्ये राहणा-या ३ मुलींवर शांती आश्रमच्या सेक्रेटरीने बलात्कार केल्याबाबत व ४ मुलींचे विनयभंग केलेबाबत निदर्शनास आले.

(२) होय.

(३) रसायनी पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ४७/२०१५ भा.दं.वि. संहिता कलम ३७६ (आय), ३७७, ३५४(अ), ३२३, ५०६ व बाल लैंगिक अत्याचार अधिनियम सन २०१२ चे कलम ४,८,१९ सह २१ प्रमाणे दि.१०.०६.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई पोलिसांमध्ये वाढत्या कर्करोगाच्या शक्यतेची लक्षणे आढळल्याबाबत**

**(२) * १६५८८ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलिसांमध्ये कॅन्सर पेशंन्टस एड असोसिएशन (सीसीएए) ने केलेल्या तपासणी शिबिरात ३००० पोलिसांमागे ७० टक्के पोलीस तंबाखू सेवनाशी संबंधीत तर ३५ टक्के पोलिसांमध्ये कर्करोगाच्या शक्यतेची लक्षणे आढळून आल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामाचे अनेक तास, अनियमित आहार आणि कमालीचा ताण यामुळे मुंबई पोलीस अनारोग्यास बळी पडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी दखल घेऊन पोलिसांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि कामाचा ताण कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती गृहनिर्माण मंडळाअंतर्गत जमिनीवर बाह्य विद्युतीकरणाच्या विकास कामात गैरव्यवहाराबाबत

**(३) * २६२५४ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती गृहनिर्माण मंडळाअंतर्गत मौजे बडनेरा, धारणी व वणी येथील जमिनीवर बाह्य विद्युतीकरणाच्या विकास कामात गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामाच्या गैरव्यवहार प्रकरणी, कार्यकारी अभियंता, गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ अमरावती यांनी चौकशी अहवालात निविदा प्रक्रियेमध्ये समावेश असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे स्वहीत दिसून येते असा स्पष्ट निर्वाळा दिला तसेच सदर विद्युतीकरण कामाची प्राधिकरण स्तरावरील अभियंतामार्फत चौकशी करावी असे सुध्दा वरिष्ठांना कळविले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, निविदा सूचना दिनांक ११ सप्टेंबर, २०११ ला प्रती दिन या दैनिकाच्या नगर-डगर या पृष्ठावर प्रत्यक्षात प्रसिध्दच केल्या नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दोषीवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) व (२) मौजे बडनेरा, धारणी व वणी येथील जमिनीवर बाह्य विद्युतीकरणाच्या विकास कामात गैरव्यवहार झाला किंवा कसे याबाबत कार्यकारी अभियंता, अमरावती मंडळ यांनी केलेल्या चौकशी अहवालात निविदा प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे स्वहित असल्याचे नमूद केले आहे.

त्या अनुषंगाने मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, म्हाडा प्राधिकरण यांनी त्यांच्या दि.२७.०३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मुख्य अधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना पुन:श्च चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार मुख्य अधिकारी, अमरावती मंडळ यांनी पुन:श्च चौकशी करुन याबाबतचा सविस्तर अहवाल मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी यांना दि.१८.०६.२०१५ रोजी सादर केला आहे. या प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) अशी वस्तुस्थिती नाही, दि.२१ सप्टेंबर, २०११ ला प्रती दिन या दैनिकाच्या नगर-डगर या पृष्ठावर निविदा प्रसिध्द केल्या आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**तासगांव (जि.सांगली) येथील पोलीस कोठडीतील ३ दरोडेखोरांनी पलायन केल्याबाबत**

**(४) * १६४२७ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तासगांव (जि.सांगली) येथील पोलीस निरीक्षकाच्या निवृत्ती समारंभाच्या स्नेहभोजनाच्या कार्यक्रमात दंग पोलीस कर्मचा-यांच्या हलगर्जीपणामुळे कोठडीतील ३ दरोडेखोरांनी पलायन केल्याचे दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ब्रिटीशकालीन कारागृहातील नेमक्या उणिवा शोधत या गुन्हेगारांनी खिडकीतून पळ काढला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दि.०१/०६/१५ रोजी रात्री ००.२० ते ०१.१५ चे सुमारास जोरदार पाऊस व वारा सुरु होवून वीज गेली होती या संधीचा गैरफायदा घेवून ३ आरोपींनी लॉकअपच्या दरवाजाच्या जाळीवर चढून लाकडी सिलींग च्या लाकडी पट्ट्या तोडून कौलावरुन प्रवेश करुन खाली उतरले व पलायन केलेबाबत आरोपींविरुध्द तासगांव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.११३/१५ भा.दं.वि.कलम २२४, ४२७, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.
(३) उक्त नमूद दाखल गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेवून १ आरोपीस दि.०५/०६/१५ व २ आरोपींना दि.०६/०६/१५ रोजी अटक करण्यात आली आहे. संबंधित लॉकअप गार्ड हवालदार व पहा-यावरील पोलीस शिपाई यांनी दुर्लक्षीपणा व हलगर्जीपणा केल्यामुळे त्यांना निलंबीत करुन त्यांची खात्यातंर्गत चौकशी करण्यात येत आहे. सदर घटनेचा तपास सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत चालवण्यात येणाऱ्या सर्वच परिवहन सेवा तोट्यात असल्याबाबत**

**(५) * १७२२७ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत चालवण्यात येणाऱ्या सर्वच परिवहन सेवा तोट्यात असून टोलच्या बोज्यामुळे या उपक्रमांच्या तोट्यात अधिकच भर पडत आहे एसटी बसेसप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालवण्यात येणाऱ्या परिवहनच्या बसेसनाही टोल माफ करण्यात यावा अशी मागणी माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटी बसेसप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत चालवण्यात येणाऱ्या परिवहनच्या बसेसनाही टोल माफी देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील ग्रामीण परिसरातील गोदामे व कंपन्या अनधिकृत असल्याबाबत**

**(६) * २४३६८ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : तारांकित प्रश्न क्रमांक ७३०६ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील ग्रामीण परिसरात गोदामाच्या नावाखाली विविध उत्पादन करणा-या कंपन्या व गोदामे अनधिकृत असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पूर्णा, राहनाळ व तळ या गावामधील ३६३५ गोदामापैकी १९३ गोदामात रासायनिक पदार्थांची साठवणूक करण्यात येत असून सदरची गावे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारितील असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमानुसार आवश्यक कारवाई करण्याबाबत प्राधिकरणास व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळास व नियंत्रक, विस्फोटक यांना तहसिलदार, भिवंडी यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या कळविलेल्या पत्रान्वये कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, अद्यापपर्यन्त किती अनधिकृत कंपन्या व गोदामांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच केलेल्या कारवाईचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सदर भागात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे विशेष नियोजन प्राधिकारी असून प्राधिकरणाचे क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांनी या भागात फिरुन माहिती मिळाल्यावरुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अन्वये २३८ अनधिकृत बांधकामावर कारवाई केलेली आहे. त्यातील १६ गाळ्यांचे निष्कासन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून करण्यात आले असून उर्वरित प्रकरणी पोलीस बंदोबस्त प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याचे प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे. सदरच्या एकूण अनधिकृत बांधकामापैकी ८ प्रकरणी न्यायालयीन दावे दाखल आहेत.

तहसिलदार भिवंडी कार्यालयाकडून प्राधिकरणास रासायनिक गोदामांची संख्या प्राप्त झाली आहे. तथापि कोणती गोदामे रासायनिक आहेत यांचा तपशिल व ठावठिकाणा नमूद नाही. याबाबत तहसिलदार भिवंडी यांचेकडून सदर गोदामांचा ठावठिकाणा जाणून घेण्यात येत आहे. तद् नंतर टप्प्या टप्प्याने सर्वेक्षण करुन बांधकाम अनाधिकृत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर कार्यवाही करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आनंद जैन सेवा मंच कोपरगाव व ओम साई प्रतिष्ठान पुणे यांनी नोकरी देण्याचे आमिष देवून महिलांची फसवणूक केल्याबाबत

**(७) * २१६९८ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आनंद जैन सेवा मंच कोपरगाव व ओम साई प्रतिष्ठान पुणे यांनी शासनामार्फत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील पाळणाघरात व अंगणवाडीत नोकरी लावून देण्याचे आमिष देवून गरजु महिलांकडून प्रत्येकी ८० हजार रुपये गोळा करुन पसार झाल्याची तक्रार दिनांक १० मार्च, २०१५ रोजी जळगांव येथील आर्थिक गुन्हे शाखेकडे बेबाबाई दगडू सपकाळे यांनी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रकरणी दि.०९/०७/२०१५ रोजी प्रश्नात नमूद महिलेच्या मुलाने दिलेल्या फिर्यादीवरुन २ महिला आरोपींविरुध्द दि.०९/०७/२०१५ रोजी फैजपूर पोलीस स्टेशन जि.जळगांव येथे गु.र.नं ४६/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ५०८, ५०६ नुसार गुन्हा दाखल आहे.

(२) होय.

(३) सदर गुन्ह्यातील साक्षीदारांना विचारपूस करुन आरोपीविरुध्द पुरावा गोळा करणेवर पोलीस तपास चालु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**रायगड जिल्हयातील खोपोली येथील रिलायन्स सिलिकॉन इंडस्ट्रीज कंपनीतील प्लॅन्ट जळाल्याने कामगार बेरोजगार झाल्याबाबत**

**(८) * २०९९६ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील खोपोली येथील रिलायन्स सिलिकॉन इंडस्ट्रीजला दिनांक २५ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास लागलेल्या आगीत ८० टक्के प्लॅन्ट जळाल्याने आगीनंतर सदर प्लॅन्ट वापरात न आल्याने कंपनीतील कामगार बेरोजगार झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बेरोजगारीमुळे कामगारांची उपासमार होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) मे.सिलिकॉन इंटरनॅशनल प्रॉडक्टस्, दहिवली गांव, ता.खालापूर, जि.रायगड या कारखान्यास दि.२५ मार्च, २०१५ रोजी लागलेल्या आगीमध्ये कारखान्यातील पाचपैकी चार शेड जळाले, अशी वस्तुस्थिती आहे. तथापि, दि. १३ जून, २०१५ पासून कारखाना पूर्ववत सुरु झालेला आहे.

कारखान्यात ३९ कामगार काम करीत असून सदर आगीमुळे उत्पादन बंद असले तरीही कारखान्यातील एकही कामगार बेरोजगार झालेला नाही.

(२) व (३) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने सदर घटनेची चौकशी केली असून सदर आगीमुळे कोणासही दुखापत झालेली नाही.

आगीची घटना घडल्यापासून कारखाना पूर्ववत सुरु होईपर्यंत कारखाना व्यवस्थापनाने सर्व ३९ कामगारांना वेतन अदा केले आहे.

-----------------

**मुंबईतील साकीनाका पोलिसांनी मॉडेलवर लैगिंक अत्याचार करुन साडेचार लाख रुपयांची खंडणी घेतल्याबाबत**

**(९) * १८५९३ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव पिचड (अकोले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील साकीनाका पोलिसांनी पंचतारांकित हॉटेलबाहेरुन मॉडेल व तिच्या मित्राचे अपहरण करुन साकीनाका पोलीस ठाण्यात आणून मॉडेलवर लैगिंक अत्याचार केल्याचे तसेच साडेचार लाख रुपयांची खंडणी घेतल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी या तरुणीने पोलीस आयुक्तांकडे एसएमएसद्वारे तक्रार केली त्यानुसार दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी सदर महिलेस पोलीस आयुक्तांनी बोलावून तिची कैफियत घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषी पोलिसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) घडलेल्या घटनेबाबत फिर्यादी महिलेने दि.२२.४.२०१५ रोजी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांची प्रत्यक्ष भेट घेऊन तक्रार केली. त्यानुसार एमआयडीसी पोलीस ठाणे, मुंबई येथे गुरक्र.००/१५ अन्वये गुन्हा नोंद केला असून, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुअवि, मुंबई येथे गुरक्र.५६/१५, कलम ३७६, ३५४(अ), ३८४, ३४१, ३४२, ३२४, ३२३, ३४, ११४ भादंविसं अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणी आठ

आरोपींना अटक करण्यात आली आहे. यातील तीन पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. सर्व आरोपी अद्यापही न्यायालयीन कोठडीत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोलापूर शहरातील ओडिशातील मायक्रो लिशींग ॲण्ड फडिंग लिमिटेड कंपनीने फसवणूक केल्याबाबत**

**(१०) * २६३४५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील सुमारे ४०० जणांची ओडिशातील मायक्रो लिशींग ॲण्ड फडिंग लिमिटेड कंपनीने २ कोटी ७२ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी जेल रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रकरणी जेल रोड पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे दि.१५/०४/१५ रोजी गुरनं. ६८/२०१५ भा.दं.वि. कलम ४७६, ४२०, ३४ सह एमपीआयडी ॲक्ट १९९९ कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

(२) व (३) गुन्ह्याचे तपासात निष्पन्न झाले की, नमुद कंपनी आरओसी, ओरिसा यांचेकडे कंपनीज ॲक्ट प्रमाणे नोंदणीकृत होती सदर कंपनीस रिजर्व बँक, भुवनेश्वर यांनी दि.२२/०१/०१ रोजी नॉन बँकींग फायनानशियल कंपनी म्हणून दिलेली नोंदणीपत्र दि.०३/०७/१४ रोजी रद्द करण्यात आले आहे असे असतांना कंपनीच्या सोलापूर शाखेने ठेवीदारांकडून ठेवी स्विकारुन ठेवीदारांना ठेवीची रक्कम परतफेड न करता ५०० पेक्षा जास्त गुंतवणूकदारांची फसवणूक केली असल्याचे आढळून आले.

सदरच्या गुन्ह्यात सदर कंपनीचे व्यवस्थापक, क्लार्क व एजंट असे एकूण ६ आरोपींना अटक करुन त्यांची पोलीस कस्टडी रिमांड घेवून तपास केला आहे. गुन्ह्याचा तपास चालु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील परिसरात सुकन्या समृध्दी योजनेत टेलिफोन ऑपरेटची नोकरी देण्याचे आमिष देवून शेकडो तरुणांची फसवणूक केल्याबाबत

**(११) * १७६२६ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील परिसरात सुकन्या समृध्दी योजनेत टेलिफोन ऑपरेटची नोकरी देण्याचे आमिष देवून शेकडो तरुणाकडून लाखो रुपयांची लुट करण्यात आली असल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी एका उमेदवारास प्रतिमहिना २४ हजार ५०० रुपये पगार देण्यात येणार असल्याचे नियुक्तीपत्र पाठवून त्यासाठी १४ हजार ५०० रुपये भरण्याची सक्ती केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) या अनुषंगाने पुणे शहर पोलीस आयुक्त यांच्या कार्यक्षेत्रात कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मौजे कांजुर (ता.कुर्ला) येथील मॅरेथॉन ग्रुप व भांडुप इस्टेट यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पुनर्विकास योजनेचा बनावट प्रस्ताव दाखल केल्याबाबत

**(१२) * २३१६४ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मौजे कांजुर (ता.कुर्ला) येथील न.भु.क्र. १५ येथील मिळकतीवर मॅरेथॉन ग्रुप व भांडुप इस्टेट यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पुनर्विकास योजनेबाबत बनावट प्रस्ताव मंजुरीसाठी दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ११ फेब्रुवारी, १९८० रोजी सदर मिळकतीबाबत भांडुप इस्टेट तर्फे त्यांच्या सर्व भागिदारांनी श्री.नारायण दगडू सावंत यांचे लाभात खरेदीखताचा दस्तावेज केलेला असूनही त्यांनी मॅरेथॉन ग्रुप बरोबर संगनमताने बेकायदेशीररित्या प्रस्ताव दाखल केल्याची लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मौजे कांजुर येथील झोपडपट्टीधारकांची फसवणुक टाळण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) मौजे कांजुर, ता.कुर्ला, न.भू.क्र. १५ या मिळकतीवरील संजीवनी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव मे.नेक्सझोन फिक्सल सर्व्हिसेस प्रा.लि.,७०२ मॅराथॉन मॅक्स, मुलुंड-गोरेगांव रोड, मुलुंड (प.) यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त झाला आहे. सद्य:स्थितीत प्राप्त झालेला प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक ३०.६.२०१४ रोजी केवळ स्विकृत केला आहे. सदर प्रस्ताव बनावट असल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) मा.लोकप्रतिनिधी यांचे निवेदन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त झालेले नाही.

सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजना न.भू.क्र. १५ च्या एकूण ११,३८०.२० चौ.मी. इतक्या क्षेत्रापैकी केवळ ४०७२ चौ.मी. क्षेत्राकरिता दाखल करण्यात आली आहे. ४०७२ चौ.मी. क्षेत्राच्या मालकी हक्काबाबत सादर केलेल्या मिळकत पत्रिकेवर धारक सदरी शेती अशी नोंद आहे. याबाबत योजनेच्या वास्तुविशारदाने सादर केलेल्या ७/१२ सदरी न.भू.क्र. १५ वरील ५२०० चौ.मी. क्षेत्रावर मे. नेक्सझोन फिक्सल सर्व्हिसेस प्रा.लि. यांच्या नावाची धारक म्हणून नोंद आहे. यावरुन असे दिसून येते की, न.भू.क्र. १५ च्या मालकी हक्काबाबतच्या कागदपत्रांवर श्री. नारायण दगडू सावंत यांच्या नावाचा उल्लेख नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मौजे शरणापूर (ता.जि.औरंगाबाद) येथील जमीन एनए करण्यासाठी लाचेची रक्कम घेताना पकडल्याबाबत

**(१३) * २२७३९ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शरणापूर (ता.जि.औरंगाबाद) येथील ३० गुंठे जमीन एनए करण्यासाठी ५ लाख रूपयाची लाचेची रक्कम घेताना नगररचना विभागातील दोन अधिकाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दिनांक १२ एप्रिल, २०१५ रोजी पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर लाच घेणा-या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त माहितीनुसार मौजे शरणापूर ता.जि.औरंगाबाद येथील गट नं.८ मधील ३० आर गुंठे जमिनीच्या रेखांकन मंजूर करण्यासाठी श्री. प्रसाद गायकवाड, सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी रु.६.०० लाखाची मागणी करुन ती लाचेची रक्कम श्री. टोंपे सहाय्यक नगर रचनाकार यांचेकडे देण्यास सांगितल्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी दि.१२.०४.२०१५ रोजी श्री.संजय यशवंत टोंपे सहायक नगर रचनाकार यांना रु.५.०० लाख इतकी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर सदर रक्कमेसह पकडले, तसेच श्री.प्रसाद सो. गायकवाड, सहाय्यक संचालक, नगर रचना यांना त्यांचे औरंगाबाद येथील राहते घरातून ताब्यात घेतले. तसेच सदर प्रकरणी त्यांचेविरुध्दय पोलीस स्टेशन उस्मानपुरा औरंगाबाद शहर येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १२, १३, (१)(ड) सह १३(२) अन्वये गु.र.नं.३००९/२०१५ दाखल करण्यात येऊन त्यांना दि.१३.०४.२०१५ रोजी अटक करण्यात आली. त्यामुळे शासनाने दोन्ही अधिका-यांना दि.१७ जून, २०१५ च्या आदेशान्वये दि.१३.०४.२०१५ पासून (म्हणजेच अटकेच्या दिनांकापासून) शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## न्हावे (ता.उरण, जि.रायगड) गावातील सर मोहम्मद युसुफ ट्रस्टच्या मालकीची जमीन सिडकोने संपादित केल्याबाबत

**(१४) * २१३५२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्हावे (ता.उरण, जि.रायगड) गावातील सर मोहम्मद युसुफ ट्रस्टच्या मालकीची २१० शेतकऱ्यांची कुळ म्हणून नावे असलेली सिडकोने संपादित केलेली १४२ हेक्टर जमीन सर मोहम्मद युसुफ ट्रस्टचे कुलमुखत्यारी श्री.उमेश उदाणी यांनी शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळू नये म्हणून विशेष भूसंपादन अधिकारी, पनवेल यांच्या संगनमताने खोटे दस्ताऐवज करुन जमिनीचा निवाडा आपल्या नावे करुन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची फार मोठ्या प्रमाणात फसवणूक केल्याची तक्रार लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या सुमारास व्यवस्थापकीय संचालक, सिडको लि. यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आलेल्या साडेबारा टक्के भूखंडाचा मोबदला अद्यापही मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधीतांवर काय कार्यवाही केली आहे, तसेच उक्त प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

मौजे न्हावे येथील जमिनीबाबत निवाडा क्र. २/९४ हा दि. २७.२.२००४ रोजी घोषित करण्यात आलेला होता. सदर निवाड्यानुसार महमद युसूफ ट्रस्टच्या ऐवजी श्री. उर्मिश उदाणी यांचे नाव लावण्यात आले आहे.

सदर निवाड्याबाबत अनियमितता आढळल्याने संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असून श्री.उर्मिश उदाणी यांना १२.५ टक्के भूखंड वाटपास स्थगिती देण्यात आली आहे व त्यांना वाटप केलेला उलवे सेक्टर ९ मधील ६,७०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड सिडकोकडून रद्द केल्याने सिडकोच्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी वाकड (पुणे) येथील अष्टविनायक कॉलनी जवळ मायलेकीच्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून दिल्याबाबत

**(१५) * २२५४३ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी वाकड (पुणे) येथील अष्टविनायक कॉलनी जवळ योगिता परदेशी व कोमल परदेशी या दोघी मायलेकी रस्त्याने जात असतांना त्यांच्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून देण्यात आल्याचे दिनांक २३ मे, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची प्रकृती चिंताजनक असून हल्लेखोर फरार झाले असून, हल्लेखोरांविरुध्द पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी झाली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी दिनांक २०.५.२०१५ रोजी योगिता परदेशी या महिलेच्या अंगावर अज्ञात इसमांनी त्यांच्या पाठीमागून येऊन रॉकेल टाकून त्यांना पेटवून देऊन गंभीर जखमी केले हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी हल्लेखोरास अटक करण्यात आली असून त्याच्याविरुध्द पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशीअंती श्रीमती योगिता परदेशी त्यांची मुलगी कोमल परदेशी हिने दिलेल्या तक्रारीवरुन वाकड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.२३७/१५ भा.दं.वि.कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला, परंतु श्रीमती परदेशी यांचा दिनांक २३.६.२०१५ रोजी मृत्यू झाल्याने भा.दं.वि.कलम ३०२ समाविष्ट करण्यात आले. सदर प्रकरणी फिर्यादिस अटक करण्यात आली आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातून नोकरीचे आमिष दाखवून पळवून आणलेल्या मुलींची गुजरातच्या खेडेगावांमध्ये विक्री होत असल्याबाबत

**(१६) * २३५०६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातून नोकरीचे आमिष दाखवून पळवून आणलेल्या मुलींची गुजरातच्या खेडेगावांमध्ये विक्री होत असल्याचे नुकत्याच पायधुनी पोलिसांनी केलेल्या कारवाईतून स्पष्ट झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पायधुनी पोलिसांनी केलेल्या कारवाईत एका अल्पवयीन मुलीला विकत घेणा-या इसमालाही पोलिसांनी अटक केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य आरोपींना अद्यापपर्यंत पोलिसांना पकडता आले नसून हे रॅकेट मुंबईतच नव्हे तर राज्यात पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) या संदर्भात पायधुनी पोलीस ठाण्याने केलेल्या तपासात पायधुनी पोलीस ठाण्याचे हद्दीतील ३ तरुणींना चांगल्या पगारावर कॅटरींगच्या कामाचे आमिष दाखवून गुजरात राज्यातील खेडेगावात पैसे घेऊन त्यांचे लग्न लावुन देण्यात आले असल्याचे आढळून आले आहे.

(३) या संदर्भात पायधुनी पोलीस ठाणे येथे गुरक्र.१२२/१५ कलम ३७०, ३७०(अ), ३७६, ३६३, ३४३, ३४४, १२०(ब) भादंविसं कलम ४, ८, १२ पोक्सो अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यात ७ आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे.

(४) या संदर्भात वेळोवेळी मोहल्ला कमिटी मिटींग, कॉर्नर मिटींग आयोजित करुन जनतेमध्ये जागरुकता निर्माण करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## काष्टी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील मालती नर्सिंग होमवर दरोडेखोरांनी दरोडा टाकून केलेल्या हल्ल्याबाबत

**(१७) * २४५२३ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काष्टी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील अजनुज चौकातील डॉ.राम पाचपुते यांच्या मालती नर्सिंग होमवर दिनांक २६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास दरोडेखोरांनी दरोडा टाकून सुमारे २० लाख रुपये किंमतीचा ऐवज लुटल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दरोड्याच्यावेळी डॉ.राम पाचपुते व त्यांच्या पत्नी डॉ.मालती पाचपुते यांच्यावर दरोडेखोरांनी केलेल्या हल्ल्यात गंभीर जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नमूद ठिकाणी व दिनांकास दरोडा पडला असून त्यामध्ये रुपये ९.२२ लक्ष किमतीचा माल चोरीस गेल्याबाबत श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १२५/१५ भा.दं.वि. कलम ३९५, ३९७, ३९३, ३८०, ५११, ३७९, प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

(२) होय.

(३) गुन्हयाच्या तपासात एका संशयीतासह ६ आरोपी निष्पन्न झाले असून सदर ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपी दि.०६/०७/१५ पर्यंत पोलीस कोठडी अभिरक्षेत आहेत व संशयीत आरोपीस न्यायालयीन कोठडी दिले आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्हयात बनावट कागदपत्रे तयार करुन शासनाच्या कौशल्य विकास व स्वयंरोजगार योजनेच्या रकमेचा अपहार केल्याबाबत**

**(१८) * २२१२९ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात बनावट कागदपत्रे तयार करुन शासनाच्या कौशल्य विकास व स्वयंरोजगार योजनेचे १ कोटी ७१ लाख रुपयाचा अपहार झाल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीचा अपहार करणा-या उपायुक्त व प्रकल्प संचालक या दोघांना सिटी चौक पोलीसांनी अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) आस्थापना अधिकारी महापालिका औरंगाबाद यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन महापालिकेमधील एक उप आयुक्त व एक प्रकल्प संचालक या २ आरोपींनी कौशल्य विकास प्रशिक्षण योजनेची बनावट यादी तयार करुन आयुक्त यांची दिशाभूल करुन रु.१,७०,४१८९३/- चा अपहार करण्याचा प्रयत्न केला म्हणून सिटी चौक पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ९५/१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४१९, ४६७, ४६८, ४७१, २०९, ५११, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

(२) होय.

(३) प्रकरणी दोन्ही आरोपींना अटक करुन त्यांना पोलीस कोठडी व न्यायालयीन कोठडी घेवून तपास करण्यात आला. सदर दोन्ही आरोपींना दि.१३/०४/१५ रोजी जामीन मिळाला असून प्रकरणाचा तपास चालू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**वांद्रे (मुंबई) येथील शासकीय वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत**

**(१९) * १७५२६ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, वांद्रे येथील सरकारी वसाहतीमधील सुमारे १०० एकर भूखंडावर शासकीय कर्मचाऱ्यांसाठी त्याच ठिकाणी वसाहत उभारुन विविध दुतावास, उच्चायुक्तांसाठी आलिशान घरे उपलब्ध करुन देणारे "डिप्लॉमॅटिक एन्क्लेव्ह" स्थापन करण्याचे नवे गृहनिर्माण धोरण प्रस्तावित करण्यात आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांद्रे येथील "डिप्लॉमॅटिक एन्क्लेव्ह" या नव्या गृहनिर्माण धोरणाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार या धोरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) व (२) वांद्रे, मुंबई येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करुन त्या ठिकाणी शासकीय कर्मचा-यांच्या आवश्यकतेनुसार सेवानिवासस्थाने बांधण्यात आल्यानंतर खुल्या विक्रीकरिता जे उर्वरित क्षेत्र उपलब्ध होईल त्या क्षेत्रात विदेशी दूतावास, विदेशी वाणिज्यिक संस्थांची कार्यालये यांच्याकरिता परराष्ट्र संबंधविषयक महासंकुल स्थापन करण्याचे गृहनिर्माण धोरण व कृती आराखडा २०१५ च्या मसुद्यात नमूद आहे. सदर मसुद्याच्या प्रती सर्व मा.कैंद्रीय व राज्य मंत्री मंडळातील मंत्री, राज्यातील सर्व संसद सदस्य व विधानमंडळ सदस्य तसेच प्रशासकीय विभागांना सूचना व अभिप्रायार्थ पाठविण्यात आल्या आहेत. त्यांच्याकडून सदर मसुद्यासंबंधी प्राप्त सूचना/अभिप्रायांचा विचार करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रामध्ये शासनाच्या नगरोत्थान योजनेअंतर्गत सुरु असलेल्या ड्रेनेज योजनेच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२०) * २३३७४ श्री.धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रामध्ये शासनाच्या नगरोत्थान योजनेअंतर्गत सुरु असलेल्या ड्रेनेज योजनेच्या कामामध्ये गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मुळ मंजूर योजनेपेक्षा अनेक कामात बेकायदेशिररित्या वाढ करुन झालेल्या कामापेक्षाही जास्त देयके काढली गेली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामाची मुदत दिनांक ३१ मे, २०१५ रोजी संपली असूनही अद्‌याप फक्त २५% ते ३०% सुध्दा कामे पूर्ण झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पाईपलाईनची कामे अपूर्ण असतानाही प्रक्रिया केंद्राची कामे सुरू करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व कामाची चौकशी करुन संबंधिताविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेच्या कामामध्ये गैरव्यवहार झाला नसल्याबाबत आयुक्त, सांगली मिरज कुपवाड यांनी कळविले आहे.

(२) मंजूर योजनेपेक्षा कामांमध्ये बेकायदेशीर वाढ करुन, कामापेक्षा जास्त बिले महानगरपालिकेमार्फत काढली नसल्याबाबत आयुक्तांनी शासनास कळविले आहे.

(३) सदर कामाच्या निविदेची मुळ मुदत ३० एप्रिल, २०१५ रोजी संपली आहे. तथापि प्रकल्पाच्या मुळ मुदतीत सांगली योजनेचे २५% तर मिरज योजनेचे काम ३९% इतके झाले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) व (६) विभागीय आयुक्त, पुणे यांना प्रत्यक्ष कामाची तपासणी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**नांदेड महानगरपालिकेच्या बीएसयुपी योजनेबाबत**

**(२१) * १७१११ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुरु ता गद्दी त्रिशताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने नांदेड महानगरपालिकेला बीएसयुपी ही अत्यंत महत्वाकांक्षी योजना मंजूर केली होती. या योजनेतून शहरातील झोपडपट्टी हटविण्यासाठी दुर्बल घटकातील नागरिकांना २७ हजार घरकुले बांधण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे महानगरपालिकेने पाठविला होता. परंतु या योजनेची मुदत दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी संपुष्टात आल्यामुळे या योजनेवर खर्च न झालेला ६५ कोटींचा निधी परत पाठवा अशी ताकीद केंद्र शासनाने दिली असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरकुले बांधण्याच्या मुदतीत घरकुलांचे बांधकाम पूर्ण न करण्याची कारणे काय आहेत तसेच केंद्र शासनाच्या या भूमिकेमुळे गेल्या दोन महिन्यापासून आणखी ३ हजार घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) नांदेड येथे बीएसयुपी कार्यक्रमाअंतर्गत एकूण ११ प्रकल्पांमध्ये २७,९८५ घरकुलांना मंजूरी मिळाली होती. तथापि, नांदेड टेक्सटाईल मिल, नॅशनल टेक्सटाईल कार्पोरेशन व गुरुद्वारा बोर्ड, नांदेड यांची जागा प्रस्तुत प्रकल्पासाठी नांदेड महानगरपालिकेस हस्तांतरीत न होऊ शकल्यामुळे ५१३६ घरकुलांचा प्रकल्प क्रमांक ३ रद्द करण्यात आला आहे. तसेच उर्वरीत प्रकल्पांमधील एकूण ३२०९ घरकुले नोव्हेंबर, २०१४ मध्ये केंद्र शासनाने रद्द केली आहेत. अशाप्रकारे मुळ योजनेतील एकूण ८३४५ घरकुले रद्द करण्यात आली आहेत. उर्वरीत १९६४० घरकुलांचे सुधारीत उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. रद्द घरकुलांसाठी वितरीत केलेला निधी व्याजासह रक्कम रु.४८.१५ कोटी केंद्र शासनास परत करणे आवश्यक आहे.

(२) व (३) घरकुलांच्या बांधकामास विलंब होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत:-

१. लाभार्थ्यांसाठी “आहे त्याच ठिकाणी” (In situ) घरकुलांचे बांधकाम करण्याचा प्रकल्प राबविण्यात येत असल्यामुळे लाभार्थ्यांचे कच्चे घर तोडुन त्या ठिकाणी नवीन घरकुल बांधणे व दरम्यान लाभार्थ्यांनी पर्यायी व्यवस्था करणे.

२. त्यांच्या हिश्याची रक्कम भरण्यास केलेला विलंब.

३. योजनेच्या कामांचे दर जुने असल्यामुळे कंत्रादारांचा मिळत नसलेला अपेक्षित प्रतिसाद व त्यामुळे कामे सुरु करण्यास झालेला विलंब.

४. जमिनीच्या मालकीसंदर्भात उद्‌भवलेली न्यायालयीन प्रकरणे.

-----------------

**मौजे वाघाळा (ता.पाथरी, जि.परभणी) येथील सोन्याचांदीच्या दागिण्यांची कारागीराने पोलिसांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत**

**(२२) * २३८८३ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाघाळा (ता.पाथरी, जि.परभणी) येथील सोन्याचांदीच्या दागिण्यांची कलाकुसर करणा-या कारागीराने दिनांक १ जून, २०१५ रोजी पोलिसांच्या त्रासाला कंटाळून विष पिऊन आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मयतांस परभणी शहर पोलीस व रेल्वे पोलीस कर्मचारी सतत फोनवरुन व पोलीस ठाण्यात बोलावून धमक्या देत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मृत व्यक्तिने आत्महत्येपुर्वी संबंधित पोलीस कर्मचा-यांची नावे चिठ्ठीत लिहून ठेवली असून सतत त्रास देवून आत्महत्येस प्रवृत्त करणा-या दोषी पोलीसाविरुध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी सराफ व सुवर्णकार असोसिएशन व्यापा-यांनी आंदोलनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व चौकशी नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) मौजे वाघाळा येथील सोन्याचांदीच्या दागिन्यांची कलाकुसर करणा-या कारागिराने विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या केली, हे खरे आहे. तथापि, त्याने पोलिसांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली किंवा नाही याबाबत तपास चालू आहे. सदर प्रकरणी सराफा असोसिएशनने दिलेल्या अर्जाच्या चौकशीवरुन पाथरी पोलीस ठाणे येथे गुरनं.९९/२०१५ कलम ३०६, ३४ भादंविप्रमाणे आरोपी पोलीस उपनिरीक्षक व पोलीस हेडकॉन्स्टेबल यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपी पोलीस हेडकॉन्सटेबल यांना निलंबित करण्यात आले असून त्याची खातेनिहाय चौकशी चालू करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

-----------------

## राज्यात दहशवादी संघटनांपासून धोका असलेल्या शहरांच्या सुरक्षेबाबत

**(२३) * २४११० श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पुण्यासह देशातील ११३ शहरांना दहशतवादी हल्ल्याचा धोका असल्याचे लंडन येथील वेरिस्क मेपलक्रॉफ्टच्या ग्लोबल अलटर्स डॅशबोर्डने केलेल्या अहवालात नमूद केले असल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयएएस, तालिबान, अल कायदा या दहशवादी संघटनांपासून धोका असल्याचे गुप्तचर यंत्रणाचे कयास आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात दहशवादी संघटनांपासून धोका असलेल्या शहरांच्या सुरक्षेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दहशतवाद विरोधी पथक व राज्य गुप्तवार्ता विभाग यांचेकडे याबाबतचा कोणताही अहवाल निदर्शनास आलेला नाही.

(२) काही महत्वाच्या व संवेदनशील ठिकाणांवर दहशतवादी गटांकडून संभाव्य अतिरेकी हल्ले/कारवाया घडवून आणण्याचा धोका असल्याबाबत गुप्तचर यंत्रणांकडून गोपनिय इशारे वेळोवेळी प्राप्त होत असतात.

(३) प्राप्त होणा-या गोपनिय इशा-यांच्या अनुषंगाने दहशतवाद विरोध पथकास सतर्क करण्यात येऊन गोपनिय माहिती मिळविण्यात येते. तसेच कोणतीही अनुचित घटना घडू नये याकरिता सर्व संबंधित कार्यक्षेत्राच्या घटक प्रमुखांना वेळीच सतर्त करण्यात येते. या घटनांचा मुकाबला करण्यासाठी प्रमाणित कार्यपध्दती तयार करण्यात आली असून वेळोवेळी सराव (Mock Drill) करण्यात येतो. महत्वाच्या व संवेदनशील स्थळांचा सुरक्षा आढावा घेण्यात येऊन त्रुटींबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## साळवी स्टॉप (जि.रत्नागिरी) येथे नगरपालिकेच्या जलतरण तलावात विद्यार्थ्यांचा बुडून झालेला मृत्यू

**(२४) * २५९०९ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साळवी स्टॉप (जि.रत्नागिरी) येथे नगरपालिकेच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या जलतरण तलावात सुरक्षेसाठी आवश्यक सोयी- साधनांच्या अभावाने व झालेल्या दुर्लक्षामुळे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिगंबर शशिकांत रहाटे या महाविद्यालयीन विद्यार्थ्याचा बुडून मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विद्यार्थ्यांच्या मृत्यूला जबाबदार असणा-या संबंधित ठेकेदार आणि जिल्हा क्रिडा अधिकारी व संबंधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी समविचारी मंचच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर उपोषण करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, चौकशीत दोषी आढळलेल्या दोषींवर शासनाने काय कारवाई केली आहे,

(४) तसेच मृत झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) होय, विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला हे खरे आहे. याबाबत रत्नागिरी शहर पोलिस ठाणे येथे जीवरक्षक श्री.संतोष अनंत सुवरे व श्रीप्रभाकर राजाराम देवरुखकर यांच्यावर गुन्हे दाखल झाला असून त्यांना अटक झाली आहे. या प्रकरणी चौकशी सुरु असल्याने कुटुंबीयांना मदत देण्याबाबत सद्य:स्थितीत प्रस्तावित नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण - शिळ आणि श्रीमलंग रोड तसेच कल्याण पूर्व शहरात बार-रेस्टॉरण्ट तसेच गुन्हेगारीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(२५) * २०२४७ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण - शिळ आणि श्रीमलंग रोड परिसरात सुमारे ४७ बार-रेस्टॉरण्ट आणि लॉजिंगबोर्डिंग असल्याने तेथील धंद्यांमुळे या परिसराला रेड लाईट एरियाचे स्वरुप आले असून, भररस्त्यात बारबालांचा सुरु असलेला धिंगाणा याबद्दल स्थानिक रहिवाशांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कल्याण पूर्व शहरात गुन्हेगारीचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढले असून मंगळसुत्र चोरी, घरफोडी, खुन खुनाचे प्रयत्न या गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोळशेवाडी पोलीस प्रशासनाकडून सर्व सामान्य नागरिकांच्या तक्रारी नोंदवुन न घेणे व गंभीर गुन्ह्या ऐवजी सौम्य कलम लावून गुन्हेगारांना मोकाट सोडणे तसेच सर्वसामान्यांना गंभीर गुन्ह्यात अडकविण्याचे प्रकार सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणांबाबत शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) कल्याण पूर्व भागातील कोळसेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत माहे जानेवारी ते मे, २०१४ मधील दाखल गुन्ह्यांपेक्षा माहे जानेवारी ते मे २०१५ या कालावधीत खुन, खुनाचा प्रयत्न, घरफोडी या गुन्ह्यांमध्ये वाढ झालेली नाही, परंतू मंगळसुत्र चोरी या गुन्ह्यांमध्ये वाढ झालेली आहे.

(३) व (४) हे खरे नाही. परंतू कोळशेवाडी पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व सामान्य नागरिकांच्या तक्रारी नोंदवून तक्रारीच्या स्वरुपानुसार गुन्हे दाखल करण्यात येतात व गुन्हेगारांवर प्रतिबंधक कारवाई केली जाते. त्यानुसार माहे मे, २०१५ मध्ये फौजदारी

प्रक्रिया संहिता, कलम १०७ प्रमाणे ४७ कलम १०९ प्रमाणे २, कलम ११० प्रमाणे ४ व मुंबई पोलीस कायदा ५६ प्रमाणे २ गुन्हेगारांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक देवळाली कॅम्पमधील कर्नलने मतिमंद मुलीवर बलात्कार केल्याबाबत**

**(२६) * १८६९४ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक देवळाली कॅम्पमधील सैन्यदलात सेवारत असलेल्या एका कर्नलने शेजारी राहणा-या मतीमंद मुलीवर दिनांक २ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास बलात्कार केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित कर्नलविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) याबाबत देवळाली कॅम्प पोलीस स्टेशनला गुरनं.२९/२०१५ भादंवि कलम ३७६(२)(एल)प्रमाणे दि.१.५.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आले असून, आरोपीस अटक करण्यात आले असून, पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर शहरासाठी पंचगंगा नदीच्या पाणी पुरवठ्यादरम्यान पाणी गळतीमुळे वाया जात असल्याबाबत**

**(२७) * २२००६ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरासाठी पंचगंगा नदीतून तब्बल ३५ ते ४० दशलक्ष लिटर पाण्याचे पाणी गळतीमुळे वाया जात असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचगंगा नदीतून दररोज सुमारे १२० ते १३० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाण्याचा उपसा केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १२० ते १३० पाण्याचे बिलिंग होणे आवश्यक असतांनाही केवळ ८५ ते ९० दशलक्ष लिटर पाणीचे बिलिंग केले जात असून उर्वरित ३५ ते ४० दशलक्ष लिटर पिण्याचे पाणी गळतीमुळे वाया जात असल्यामुळे वर्षाला सुमारे ८ कोटीचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी / पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले. तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

(२) पंचगंगा नदीतून दररोज सुमारे १२० दशलक्ष लिटर पाण्याचा उपसा केला जातो.

(३) पाणी पुरवठ्या दरम्यान होणा-या गळतीमुळे नदीतून उपसा करण्यात येणा-या व प्रत्यक्ष होणा-या पाणीपुरवठ्यात सुमारे ४६ दशलक्ष लीटर एवढी तफावत आहे. ही वस्तुस्थिती आहे.

मात्र यावर प्राथमिक उपाययोजना म्हणून कोल्हापूर महानगरपालिकेतर्फे गळती शोधून त्याची दुरुस्ती करणे, आवश्यक ठिकाणी पाईप बदलणे इत्यादी उपाययोजना केल्या जात आहेत. त्यामुळे गळतीचे प्रमाण काही अंशी कमी होण्यास मदत झाली आहे.

याप्रकरणी दिर्घकालिन उपाययोजना करण्याच्या दृष्टीने पाणीपुरवठ्याचे प्राधान्याने वॉटर ऑडीटिंग करुन घेण्याचा महानगरपालिकेचा प्रस्ताव आहे.

अशाप्रकारे या गळतीवर मात करण्यासाठी महानगरपालिकेकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

(४) कोल्हापूर महानगरपालिकेकडून याबाबत आवश्यक उपाययोजना केली जात असल्याने शासनाने चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) हद्दीमधील रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरणाचे काम मेसर्स मोनार्क असोसिएटच्या मार्फत सुरु असल्याबाबत**

**(२८) * १९३०६ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) हद्दीमध्ये सुमारे ११ रस्त्यांची सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याची कामे मेसर्स मोनार्क असोसिएटच्या मार्फत सुरु असून सदर ११ रस्त्यांची कामे निकृष्ठ दर्जाची झाल्याबाबतचा अहवाल रस्ते अभियंत्याने महानगरपालिकेकडे दिल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती मेसर्स मोनार्क असोसिएट या कंपनीवर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे येथील शिळफाटा परिसरातील बार मालकांकडून पोलीस हप्ते घेत असल्याबाबत**

**(२९) * २५२०४ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील शिळफाटा परिसरातील एका बारवर काही दिवसांपूर्वी विशेष शाखेच्या पथकाने टाकलेल्या छाप्यात पोलीस स्थानकाला दरमहा ३० हजार रुपये हप्ता जात असल्याची नोंद आढळून आली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच, दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी शिळफाटा परिसरातच रिंगटोन या लेडीज बारवर पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात बार मालकाच्या डायरीत अनेक पोलिसांना हप्ता देत असल्याची नोंद आढळून आली असून पोलीस मोठया प्रमाणात हप्ता घेत असल्यामुळेच ठाण्यातील बार सुरु असल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे पोलीस आयुक्तालयातील डायघर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील शिळफाटा परिसरातील उत्सव बारवर दिनांक १६.०४.२०१५ रोजी विशेष शाखा, ठाणे पथकाने छापा टाकला असुन सदर बाबत डायघर पोलीस स्टेशन ला गुन्हा रजि. नं.९५/२०१५ भादंविसं कलम २९४, ३४ सह मुंपोका कलम ३३ (डब्ल्यू), १३१ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर छाप्याच्यावेळी पोलीस पथकाला काही कागदपत्रे मिळून आली त्यावर काही पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नावे आढळून आली आहेत.

(२) ठाणे पोलीस आयुक्तालयातील डायघर पोलीस स्टेशन हद्दीतील शिळफाटा परिसरातील रिंगटोन बारवर दिनांक १८.०४.२०१५ रोजी डायघर पोलीस स्टेशन यांनी छापा टाकला असून सदर बाबत डायघर पोलीस स्टेशन गुरनं ९८/२०१५ भादंविसं कलम २९४, ३४ प्रमाणे दिनांक १९.०४.२०१५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर वेळी पोलीसांनी टाकलेल्या छाप्यात पोलीसाना हप्ता देत असल्याची नोंदीची डायरी मिळून आलेली नाही.

(३) व (४) सदर चौकशीस पारदर्शकता यावी व नैसर्गिक न्यायाने चौकशी व्हावी म्हणून १३ अधिकारी व ४७ पोलीस कर्मचारी यांची दिनांक २३.०५.२०१५ रोजी तात्काळ मुख्यालय, ठाणे येथे बदल्या करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जामखेड (जि.अहमदनगर) येथील अतिक्रमण काढण्यास गेलेल्या महिला पोलीस व ग्रामविकास अधिकारी यांच्यावर अतिक्रमणधारकांनी रॉकेल टाकून जाळण्याचा प्रयत्न केल्याबाबत

**(३०) * १९९६९ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामखेड (जि.अहमदनगर) येथील ग्रामपंचायतीच्या बाजारतळावर मोकळ्या जागेवर केलेले अतिक्रमण काढण्यास गेलेल्या महिला पोलीस कर्मचारी व ग्रामविकास अधिकारी यांच्यावर अतिक्रमणधारकांनी हल्ला करून रॉकेल टाकून जाळण्याचा प्रयत्न केल्याची घटना माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार शासन स्तरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय. सदर प्रकरणी दि. १४.५.२०१५ रोजी जामखेड पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र.७०/२०१५ भारतीय दंडविधान संहिता कलम ३०७, ३५३, ३३२, १४३, १४७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ४ आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित ३ आरोपींना मा.जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर यांनी अंतरिम जामीन मंजूर केला आहे. अन्य एक आरोपी फरार असून तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्ह्यात स्वातंत्र्य सैनिकांचा नातेवाईक असल्याचे नामनिर्देशनपत्र देऊन शासकीय नोकऱ्या मिळविणा-या कर्मचा-यांची चौकशी करण्याबाबत**

**(३१) * १८०६२ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात स्वातंत्र्य सैनिकांचे नातेवाईक असल्याचे नामनिर्देशनपत्र देऊन शासकीय नोकऱ्या मिळविणा-या सार्वजनिक बांधकाम विभागासह इतर विभागातील कर्मचा-यांची चौकशी करावी असे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना नुकतेच दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिका-यांनी याप्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, या प्रकरणी संबंधित दोषी असणा-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी जनहित याचिका क्र.४३/२०११ श्री. पांडुरंग निवृत्ती मोने विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील एकूण २२० प्रकरणी शासन निर्णय २४.०६.१९९७ मधील तरतुदीनुसार निर्णय घेण्याचे आदेशित केले होते.

तसेच मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल याचिका क्र.४८८/२०१५ श्री. आत्माराम तुकाराम तातोडे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक १८.०४.२०१५ रोजी स्वातंत्र सैनिक कै.लक्ष्मण सखाराम खेसर यांच्या प्रकरणी चौकशीचे आदेश पारीत केले आहेत.

(२) आतापर्यंत एकुण ४८ प्रकरणात उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी चौकशी करुन निर्णय दिलेले आहेत. उर्वरीत प्रकरणात अंतिम निर्णय घेणेबाबतची प्रक्रिया जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचे स्तरावर चालु आहे.

(३) सदर प्रकरणी संबंधित दोषी असणा-या स्वातंत्र सैनिक नामनिर्देशित पाल्यांचे नामनिर्देशनपत्र रद्द केल्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे पारीत करुन पुढील कार्यवाहीसाठी संबंधित विभाग प्रमुखास कळविले आहे. उर्वरीत प्रकरणात अंतिम निर्णय घेणेबाबतची प्रक्रिया जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत चालु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला महानगरपालिका अंतर्गत एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटीमध्ये अपहार झाल्याबाबत

**(३२) * २१४२२ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिका अंतर्गत एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी मध्ये ५० लाख रुपयांचा अपहार झाल्याचे प्रकरण निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याविरुध्द अनियमिततेचा अहवाल शासनास सादर झालेला असून त्यामध्ये मनपा आयुक्त यांनी दोषी असतील त्याच्यांवर कार्यवाही करावी असे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालात अनेक अधिकारी दोषी असून त्यांच्यावरही कारवाई व्हावी अशी मागणी केली आहे यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

विधान मंडळात तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने सदरचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

(२) तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, अमरावती यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. विभागीय आयुक्त यांनी सादर केलेला अहवाल पुढील कार्यवाहीसाठी आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्याकडे पाठविण्यात आला होता.

(३) दरम्यान आयुक्त (कु.क.) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान महाराष्ट्र, मुंबई यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्रिसदस्य समितीने लेखापरिक्षण करुन त्याबाबतचा अहवाल आयुक्त, अकोला महानगरपालिका, अकोला यांना परस्पर सादर केला.

आयुक्त (कु.क.) यांच्या त्रिसदस्यीय समितीने दिलेल्या चौकशी अहवालांच्या अनुषंगाने आयुक्त अकोला महानगरपालिका यांनी जबाबदारी निश्चित करुन संबंधीतांकडून वसुली पात्र रक्कम वसूल करण्याची कार्यवाही केलेली आहे.

तथापि, विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या तपासणी मध्ये जी कागदपत्रे उपलब्ध झालेली नव्हती ती आयुक्त (कु.क.) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध झाल्यामुळे विभागीय आयुक्त, अमरावती व आयुक्त (कु.क.) तथा अभियान संचालक यांच्या अहवालात एकवाक्यता नसल्याने विभागीय आयुक्त, अमरावती यांना प्रस्तुत प्रकरणी फेरतपासणी करण्याची विनंती आयुक्त, अकोला महानगरपालिका यांनी केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पाटण (जि.सातारा) तालुक्यात विविध पवनचक्क्या कंपन्याचे पवनऊर्जा प्रकल्प साकारतांना स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावून फसवणूक केल्याबाबत**

**(३३) * २१८९४ श्री.शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यात सहयाद्रीच्या पठारावर मोठया प्रमाणात विविध पवनचक्क्या कंपन्याचे पवनऊर्जा प्रकल्प साकारतांना स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावून फसवणूक करुन गुंडामार्फत तसेच पोलीस यंत्रणेला हाताशी धरुन धमकावण्याचे तसेच जीवे मारण्याच्या धमक्या देवून दहशत निर्माण करण्याचे प्रकार सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना सरंक्षण देवून विविध पवनचक्क्या कंपन्यांनी शेतकऱ्यांची केलेली फसवणूक व दहशत निर्माण करणाऱ्या गुंडाना आळा बसण्याकरीता राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात याकरीता मा. मुख्यमंत्री यांना दिनांक २ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, चौकशी न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) व (४) लोकप्रतिनिधी यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून त्यानुसार तक्रार अर्जासोबत जोडलेल्या ५९ तक्रारदाराच्या यादीत २१ तक्रारदारांची नावे २ वेळा आली आहेत. २५ तक्रारदाराचे जबाब नोंदविण्यात आले असून २ तक्रारदारांनी त्याचे जबाब नोंदविण्यास नकार दिला १३ तक्रारदार नोकरीधंद्यानिमित्त बाहेर गावी राहतात.

तक्रारदाराच्या नोंदविलेल्या जबाबानुसार तक्रारदार शेतक-यांनी त्याच्या जमिनी खरेदीपत्र, नोटरी व मुख्यत्यारपत्राने दिलेल्या असून कंपनीकडून मोबदला दिला आहे व काही वारसदार मोबदल्यास अपात्र आहेत. काही शेतक-यांनी जमीनीमध्ये पवनऊर्जा कंपनीने अतिक्रमण केलेले आहे. त्याबाबतचे दावे न्यायप्रविष्ट आहेत. तसेच २४ तक्रारदार हे पवनऊर्जा कंपन्यामध्ये सुरक्षारक्षक म्हणून काम करत असून त्यांचे वेतन, भत्ते, सेवेत काम करणे, बोनस इ. मागण्या प्रलंबित असल्याने त्यांनी लोकप्रतिनिधीकडे अर्ज केलेले आहेत. एकंदरीत तक्रारदार हे पवनचक्की विरोधात तक्रार देण्यास तयार नाहीत.

-----------------

## हिराचंद रायसोनी मल्टीस्टेट पतसंस्थेने विदर्भ, खान्देशात व अन्य ठिकाणी ठेवीदारांना कोट्यवधी रुपयांना फसविल्याबाबत

**(३४) * २३८०८ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठेवीदारांची कोट्यावधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या जळगांवच्या हिराचंद रायसोनी (बी.एच.आर) मल्टीस्टेट पतसंस्थेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालकांसह बारा जणाविरोधात चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर पतसंस्थेने विदर्भ, खान्देशात व अन्य ठिकाणी ठेवीदारांना कोट्यवधी रुपयांना फसविल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पतसंस्थांवर नियंत्रण आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने कायदे तयार करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय, त्यावर अंमलबजावणी केव्हापर्यंत होणार आहे,

(४) तसेच उक्त पंतसंस्थाची शासनाने सखोल चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) व (४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून पोलीस स्टेशन चिखली येथे गु.र.क्र. ८०/१५ भा.दं.वि. ४२०, ४०९, १२० ब अन्वये पतसंस्थेचे अध्यक्ष/उपाध्यक्ष व संचालक मंडळ अशा १२ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भिवंडी शहर महानगरपालिकेच्या ठेकेदारांनी केलेल्या कामाचे देयक अदा करतांना अडवणूक केल्याबाबत**

**(३५) * २०७२३ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी शहर महानगरपालिकेच्या ठेकेदारांनी केलेल्या कामाचे देयक अदा करतांना अडवणूक करुन त्यांच्याकडून १५ ते २० टक्के कमिशन घेऊन मर्जीप्रमाणे देयकाला मंजूरी देऊन टक्केवारी घेणाऱ्या मुख्य लेखा अधिकाऱ्यांसह लेखा विभागातील तीन अधिकाऱ्यांच्या कारभाराची चौकशी करुन निलंबित करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती यांनी दिनांक १० मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
परंतु प्रश्नाधिन विषयाच्या अनुषंगाने उप सभापती, महिला व बाल विकास, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी प्रधान सचिव, नगर विकास यांना दिनांक निरंक अन्वये तक्रार केली आहे.
(२) याबाबत आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांना दिनांक १६.०६.२०१५ रोजी पाठविले असता त्यांनी दिनांक ०६.०७.२०१५ अन्वये तक्रारी तथ्य नसल्याचे कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील बिंदु चौक सब जेल मधील कैद्यांना तुरुंग रक्षकाकडून मोबाईल हॅण्डसेट पुरविण्यात आल्याबाबत

**(३६) * २३२४२ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील बिंदु चौक सब जेल मधील कैद्यांना तुरुंग रक्षकाकडूनच मोबाईल हॅण्डसेट पुरविण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तुरुंग रक्षकाने १० हजार रुपये घेवून कैद्यांना मोबाईल व सीमकार्ड पुरविल्याचे चौकशीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तुरुंग रक्षकावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) संबंधित तुरुंग रक्षकास निलंबित करण्यात आले असून त्याचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) १९७९ मधिल नियम ८ खाली विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यात बनावट खत निर्मितीचा कारखाना सुरु असल्याबाबत

**(३७) * २३१०४ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यात खत निर्मितीचा परवाना व मान्यता नसताना सुध्दा प्रतिकनगर मध्ये मीठ व रंगाचे मिश्रण करुन बनावट खताची विक्री करणारा कारखाना सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारखान्यावर पोलिसांनी कारवाई करुन खतासाठी वापरण्यात येणारे साहित्य व ५ लाखांच्या मुद्देमालासह कार जप्त केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एका राहत्या घरामध्ये गेल्या तीन वर्षापासून खत निर्मिती करण्यात येत होती व त्याला एका कंपनीचे नाव देऊन राज्यभरात विक्री करण्यात येत होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकरी खरिप हंगामाच्या तयारीला लागलेला असतानाच काही बनावट बियाने व खत निर्मिती करणा-या टोळ्या सक्रिय झाल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी प्रतीकनगर, मुर्तिजापूर येथील राहते घरात ४,५९,४००/- चे साहित्य व एक कार जप्त करण्यात आली आहे.

(३) होय.

(४) नाही.

(५) दिनांक ३०.५.२०१५ रोजी गुणनियंत्रक निरिक्षक, मुर्तिजापूर त्यांचे पथक व पोलीस स्टाफ यासह प्रतीकनगर, मुर्तिजापूर येथील घराची झडती घेतली असता सदर घरात रासायनिक खते व बनावटी खत असे एकूण रु. ४,५९,४००/- चे साहित्य जप्त करण्यात आले. बनावट रासायनिक खतासारखे दिसणारे परंतु खत नसलेले विद्राव्य द्रव्याचे बनावट खत तयार करुन शेतक-यांना विक्री करुन त्याची आर्थिक फसवणूक केल्याबाबत पोलीस स्टेशन, मुर्तिजापूर येथे गु.र.क्र. १२५/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४६८, ४७१, १०९, ३४ ई.सी.ॲक्ट सह कलम ३,७ व रासायनिक खत अधिनियम सह कलम ७,१२,१९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्हयाच्या तपासाअंती एकूण ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरासाठी बर्न सेंटर उभारण्याबाबत

**(३८) * १७२४० श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी असून वैद्यकिय सेवेसाठी पेशंट देशाच्या कानाकोपऱ्यातून मुंबईत येत असूनही अद्यापही मुंबईत बर्न सेंटर नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव माहे मे, २०१५ मध्ये काळबादेवी येथे आगीच्या इमारत दुर्घटनेत जखमी अग्निशमन जवानांना उपचारासाठी नवी मुंबईत जावे लागते वास्तविक मुंबई मनपाने याबाबत यापूर्वीच बर्न सेंटर मुंबईत उभारण्याकरिता आवश्यक कार्यवाही करणे गरजेचे असुनही याबाबत मुंबई मनपाने दुर्लक्ष केल्याने आग दुर्घटनाग्रस्तांना उपचारार्थ नवी मुंबईत जावे लागते हे पाहता शासन त्वरीत याबाबत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील आगीने भाजलेल्या आपत्तीधारक रुग्णांना भविष्यात अत्याधुनिक उपचार मिळण्यासाठी स्वतंत्र असे नवीन स्टेट बर्न रुग्णालय उभारण्याबाबतची आवश्यकता व त्याबाबतची तातडीची गरज लक्षात घेऊन मुंबईतही मध्यवर्ती ठिकाणी रुग्णालय सुरु करण्याबाबत शासनाकडे लोकप्रतिनिधी व नागरीकांनी काळबादेवी आगीच्या दुर्घटनेनंतर मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मुंबईमध्ये लोकमान्य टिळक रुग्णालयामध्ये १४ खाटांचा विशेष बर्न विभाग, के.ई.एम.रुग्णालयात १२ खाटा आणि कस्तुरबा रुग्णालयात भाजलेल्या रुग्णांकरिता २५ खाटांचा विशेष कक्ष आहे.

(२) दिनांक ९ मे, २०१५ मध्ये काळबादेवी येथे इमारतीस लागलेल्या आगीच्या दुर्घटनेत जखमी झालेल्या अधिकाऱ्यांना दुर्घटना स्थळापासून जवळ असलेल्या मसिना रुग्णालय व बॉम्बे हॉस्पिटलमध्ये तातडीच्या उपचाराकरिता हलविण्यात आले होते.

तथापि तेथील डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्यानुसार या अधिकाऱ्यांना नवी मुंबई येथील नॅशनल बर्न सेंटर हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले.

(३) हे खरे नाही. तथापि मुंबईमध्ये स्वतंत्र अत्याधुनिक बर्न हॉस्पिटल उभारण्याबाबतची आवश्यकता तपासून पाहण्याच्या सूचना आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये अत्याधुनिक सोनोग्राफी मशीनमध्ये गैरव्यवहाराबाबत**

**(३९) * २६५७३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये गैरव्यवहाराचे प्रकरण सुरु असून बाजारात १० ते १२ लाख रुपयांनी मिळणारे अत्याधुनिक सोनोग्राफी मशीन २२ लाख रुपयांना व ७ हजार रुपयांनी मिळणारे श्रवणयंत्र ९ हजार रुपयांना आणि ६.५० ते ७ हजार रुपयांनी मिळणारी थ्री सिटर खुर्ची ९ हजार रुपयांना अशा प्रकारे दामदुपटीने सदर साहित्य खरेदी करण्यासाठी महानगरपालिकेने मंजूरी दिली असल्याची माहिती दिनांक २० जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेमार्फत खरेदी करण्यात येणा-या विविध प्रकारच्या साहित्य खरेदीमध्ये गैरव्यवहार असल्याने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी काही नगरसेविकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतर्फे अत्याधुनिक सोनोग्राफी मशिन, श्रवणयंत्र व थ्री-सीटर चेअर खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेतील दर स्पेसिफिकेशन्सनुसार असल्याने, अत्याधुनिक सोनोग्राफी मशिन रुपये २२,००,०००/-, श्रवणयंत्र रुपये १३,४००/- व थ्री/सीटर चेअर रुपये ८,९६०/- असे लघुत्तम दर प्राप्त झाल्याने दिनांक १६.६.२०१५ च्या स्थायी समितीने मंजुरी दिली आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नगर सेविकांनी फेरनिविदा काढण्याची मागणी केली ही वस्तुस्थिती आहे.

(३) उपरोक्त भाग-१ च्या उत्तरात नमूद केल्यानुसार विषयांकित मशिन्सच्या निविदेबाबत लघुत्तम दरास स्थायी समितीने दिनांक १६.६.२०१५ रोजी मान्यता दिली आहे. मात्र, लघुत्तम निविदाधारकांस अद्यापही कार्यादेश देण्यात आलेला नाही.

सदर वैद्यकीय उपकरणांचे दर स्पेसिफिकेशन्सी तसेच बाजारभावांशी अनुरुप आहेत याची खातरजमा करुन पुढील उचित कार्यवाही करण्याबाबत तसेच यापुढे वैद्यकीय उपकरणाच्या खरेदीसाठी वैद्यकीय तज्ञ सल्लागार समितीची स्थापना

करुन सदर समितीच्या सल्ल्यानुसार निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्ह्यात देगलूर नगरपालिकेच्यावतीने अनुसूचित जाती व नवबौध्द या घटकासाठी शौचालयाचे बांधकाम व नळ जोडणीबाबत**

**(४०) * १७१३७ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात देगलूर नगरपालिकेच्यावतीने अनुसूचित जाती व नवबौध्द या घटकासाठी शौचालयाचे बांधकाम व नळ जोडणीसाठी देण्यात आलेला कोट्यवधी रुपयांच्या निधीचा आंधातील कंत्राटदाराशी संगनमत करुन नगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांनी गैरव्यवहार केल्याचा प्रकार माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पारोळा (जि.जळगांव) शहरात बनावट दारु जप्त केल्याबाबत**

**(४१) * १९९७२ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा):** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगांव) शहरात शिरुड (ता.जि.धुळे) येथून आणण्यात आलेल्या बनावट दारुचे ३०० खोके व वाहन पारोळा पोलिसांनी जप्त केले असून सदर जप्तीमध्ये दारुची किंमत पाच लाख तर वाहनाची किंमत ७ लाख असा एकूण १२ लाखांचा ऐवज जप्त केल्याची माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गुन्हा दाखल करुन कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दि.२७/०५/१५ रोजी दारुचे ३०० खोके अनाधिकृतरित्या बोले गावाजवळून बेकायदा विना पास परमिट कब्जात बाळगुन तीची वाहतूक करतांना मिळून आल्याने ४ आरोपीतांविरुध्द मुंबई प्रोव्हीबिशन कायदा कलम ६५(ई), ८१, ८३ नुसार गुन्हा दाखल आहे.

गुन्ह्यातील ३०० दारुचे खोके व आयशर कंपनीचा ट्रक जप्त करण्यात आला असून गुन्ह्यातील ३ आरोपींना अटक करुन पोलीस व न्यायालयीन कोठडी घेऊन तपास करण्यात आला, दि.२८/०५/१५ रोजी आरोपींना जामीनावर मुक्त करण्यात आले असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## पातूर नगरपरिषदेमध्ये (जि.अकोला) एकात्मिक गृहनिर्माण घरकुल योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४२) * २६५३६ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातूर नगरपरिषदेमध्ये (जि.अकोला) एकात्मिक गृहनिर्माण घरकुल योजनेमध्ये झालेल्या कोट्यावधी रुपयांच्या गैरव्यवहाराची चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत नगरपरिषद, पातूरचे उपाध्यक्ष यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ३ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त निवेदनानुसार सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) नाही. प्रस्तुत निवेदन मुख्यमंत्री सचिवालयास प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई परिसरात पाणी साचल्याने करोडो लोकांचे जनजीवन ठप्प झाल्याबाबत**

**(४३) * २६५७४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई परिसरात दिनांक १८ आणि १९ जून, २०१५ च्या सुमारास मोठया प्रमाणात सतत पाऊस पडल्यामुळे संपूर्ण मुंबई परिसरात पाणी साचल्याने करोडो लोकांचे जनजीवन ठप्प झाले असून महानगरपालिका व शासनाच्या दुर्लक्षपणामुळेच करोडो नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागला असल्याची बाब दिनांक २० जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्या अगोदर ११८ कोटी रुपये खर्च करुन मुंबई महानगरपालिकेने नाल्याची साफसफाई केली तसेच करोडो रुपये खर्च करुन पंपीग हाऊसचे काम करण्यात आले असतांना सुध्दा ऐन पावसाळ्यातच पंपीग बंद पडल्याने मुंबई जलमय झाल्याने सर्व व्यवहार ठप्प झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नाल्यातील गाळ काढणे व सदर गाळाची विल्हेवाट लावणे याबाबत करण्यात आलेल्या कामांची चौकशी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी समिती नियुक्त केली आहे. सदर चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** <br>
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे** <br>
**प्रधान सचिव,** <br>
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.